Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।बुधवार, दि. ३ जून २०२६। वर्ष १ ।अंक ५९ ।पाने २। DIGITAL EDITION

टिटवाळा नांदप रोडवरील प्रचंड वाहतूक कोंडी!

(पान २ वर)



## वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाने अनेक जिल्ह्यांत हाहाकार

# महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा धुमाकूळ!

**जन सम्राट टाईम्स**

**अहिल्यानगर/नाशिक/ जळगाव : महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये मंगळवारी अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटाने अक्षरशः धुमाकूळ घातला. काही भागांमध्ये नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला असला तरी अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात भिंत कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला, तर जळगावमध्ये वादळी वाऱ्यामुळे आंदोलनस्थळी उभारलेला मंडप आंदोलकांच्या अंगावर कोसळल्याची घटना घडली.**

## बारामतीत महिलेचा मृत्यू, जळगावात आंदोलकांवर कोसळला मंडप

बारामती तालुक्यातील माळवाडी येथे अवकाळी पावसामुळे दुर्दैवी घटना घडली. नंदा लडकत या महिलेचा भिंत कोसळून मृत्यू झाला. वादळी पावसापासून बचाव करण्यासाठी त्या आणि आणखी एक महिला गावातील पत्र्याच्या शेडमध्ये आश्रयासाठी गेल्या होत्या. मात्र अचानक शेडची भिंत कोसळल्याने दोघी ढिगाऱ्याखाली अडकल्या. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत त्यांना बाहेर काढले. गंभीर जखमी झालेल्या नंदा लडकत यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला, तर दुसऱ्या महिलेवर उपचार सुरू आहेत. या घटनेत शेडमध्ये



असलेल्या 13 ते 15 शेळ्यांचाही मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसांपासून बारामती परिसरात सुरू असलेल्या वादळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेती, जनावरे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनाने पंचनामे सुरू केले आहेत. दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील करंजी येथे भरलेल्या आठवडे बाजारावरही अवकाळी पावसाने तडाखा दिला. दुपारी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे बाजारपेठेत एकच गोंधळ उडाला. भाजीपाला विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात माल भिजून खराब झाला. अनेक व्यापाऱ्यांच्या ताडपत्र्या, प्लास्टिक शेड आणि छत्र्या वाऱ्याने उडून गेल्याने नुकसान झाले. अनेक विक्रेत्यांना माल सोडून सुरक्षित स्थळी धाव घ्यावी लागली. नाशिक शहरातही दुपारनंतर दमदार पावसाची हजेरी लागली. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला.गारवा निर्माण झाल्याने शहरातील तापमानातही घट झाली. हवामान खात्याने काही दिवस वातावरणात बदल कायम राहण्याची शक्यता वर्तवली आहे.

### आंदोलक किरकोळ जखमी

जळगावमध्ये मात्र वादळी वाऱ्यामुळे एक धक्कादायक घटना घडली. उपनिबंधक कार्यालयासमोर सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान जोरदार वाऱ्याने मंडप उखडून आंदोलकांच्या अंगावर कोसळला. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असली तरी काही आंदोलक किरकोळ जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हवामान विभागाने पुढील 24 तास राज्यातील अनेक भागांत मेघगर्जनेसह पाऊस, वादळी वारे आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे तसेच शेतकरी, व्यापारी आणि पशुपालकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### Selected

## केरळमध्ये मान्सूनचा प्रवेश गुरुवारी अपेक्षित

नवी दिल्ली | भारतीय वामानशास्त्र विभागाच्या (आयएमडी) ताज्या अंदाजानुसार यंदाचा नैऋत्य मान्सून केरळमध्ये गुरुवार, ४ जूनच्या आसपास दाखल होण्याची शक्यता आहे. हवामानातील बदल आणि वाऱ्यांच्या स्थितीमुळे मान्सूनच्या आगमनास काहीसा विलंब झाला असून, पूर्वी व्यक्त करण्यात आलेला अंदाज बदलावा लागला आहे. आयएमडीने यापूर्वी २६ मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल होईल, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला होता.

मात्र वातावरणातील बदलत्या परिस्थितीमुळे हा अंदाज प्रत्यक्षात साकार झाला नाही. सर्वसाधारणपणे मान्सूनचा केरळमधील प्रवेश १ जूनच्या सुमारास होतो. मान्सूनच्या प्रगतीसाठी अनुकूल परिस्थिती सध्या नैऋत्य आणि आग्नेय अरबी समुद्र,तामिळनाडूचे काही भाग तसेच बंगालच्या उपसागरात मान्सूनच्या पुढील प्रवासासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे.

## अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाला भीम आर्मीचा ठाम विरोध

### आंबेडकरी नेत्यांच्या एकत्रीकरणाचे आवाहन; 'आरक्षण बचाव'साठी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**जन सम्राट टाईम्स**

**सोलापूर | प्रतिनिधी:** अनुसूचित जाती (एससी) आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याच्या प्रस्तावित धोरणाविरोधात भीम आर्मी महाराष्ट्रने तीव्र विरोध दर्शविला असून, समाजात फूट पाडणारे आणि संविधानिक समानतेच्या तत्त्वाला बाधा आणणारे कोणतेही उपवर्गीकरण स्वीकारले जाणार नसल्याची स्पष्ट भूमिका मांडली आहे. भीम आर्मी महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष अशोक कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून हा निर्धार व्यक्त केला. निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जाती समाजाला भारतीय राज्यघटनेने समान हक्क आणि संधी प्रदान केल्या आहेत. अशा परिस्थितीत आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न हा संविधानाच्या




मूलभूत तत्त्वांशी विसंगत असून समाजातील ऐक्याला तडा देणारा ठरू शकतो. त्यामुळे या निर्णयाविरोधात राज्यभर जनजागृती आणि संघर्ष उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. भीम आर्मीने यावेळी आंबेडकरी चळवळीतील सर्व नेते, सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. वैचारिक मतभेद, राजकीय भूमिका आणि व्यक्तिगत अहंकार बाजूला ठेवून समाजाच्या व्यापक हितासाठी संयुक्त लढा उभारण्याची वेळ आली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. उपवर्गीकरणाच्या विरोधात बीड येथून मुंबईकडे निघणाऱ्या प्रस्तावित लाँग मार्चच्या पार्श्वभूमीवर भीम आर्मीने सर्व आंबेडकरी नेत्यांनी आणि संघटनांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. सामाजिक न्याय आणि आरक्षणाच्या संरक्षणासाठी होणाऱ्या या आंदोलनात समाजाचे नेतृत्व सहभागी झाले नाही, तर त्यांच्याविषयी समाजात नाराजी निर्माण होऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे. भीम आर्मीने संघर्षासोबतच सामाजिक ऐक्यालाही महत्त्व दिले असून, समाजहितासाठी सर्व घटकांनी एकजूट राखावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. हा लाँग मार्च संविधानिक हक्क, सामाजिक न्याय आणि आरक्षणाच्या संरक्षणासाठी ऐतिहासिक ठरणार असल्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

### जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## सीबीएसईच्या कथित गैरव्यवहाराची चौकशी

### सरकारकडून चौकशी समितीची स्थापना

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) ऑन-स्क्रीन मार्किंग (ओएसएम) सेवांच्या खरेदी प्रक्रियेत कथित अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याच्या संशयावरून केंद्र सरकारने मोठी प्रशासकीय कारवाई केली आहे. या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष चौकशी समितीची स्थापना करण्यात आली असून, चौकशी प्रक्रियेतील पारदर्शकता राखण्यासाठी सीबीएसईचे अध्यक्ष आणि सचिव यांची तात्काळ प्रभावाने बदली करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे डिजिटल मूल्यमापन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीसाठी बाह्य संस्थांकडून सेवा घेण्याच्या प्रक्रियेत काही अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. निविदा प्रक्रिया, करार मंजुरी आणि सेवा खरेदीसंदर्भातील विविध बाबींची तपासणी करण्यासाठी सरकारने स्वतंत्र चौकशी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर सीबीएसईच्या सर्वोच्च प्रशासकीय पदांवर कार्यरत असलेल्या अध्यक्ष आणि सचिव यांची अन्यत्र बदली करण्यात आली आहे. या बदल्यांचा उद्देश चौकशीवर कोणताही




प्रभाव पडू नये आणि तपास निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने पार पडावा हा असल्याचे सूत्रांनी सांगितले. विशेष

### चौकशी अहवालानंतर स्पष्ट होणार वस्तुस्थिती

सध्या सरकारकडून चौकशी समितीला आवश्यक कागदपत्रे आणि माहिती उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. समितीचा अंतिम अहवाल आल्यानंतरच या प्रकरणातील तथ्य, जबाबदाऱ्या आणि संभाव्य गैरव्यवहाराबाबत स्पष्ट चित्र समोर येणार आहे. दरम्यान, सीबीएसईचे नियमित कामकाज सुरळीत सुरू राहणार असून, विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक संस्थांवर या प्रशासकीय बदलांचा कोणताही परिणाम होणार नसल्याचे संबंधित सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

## दोन लाखांपर्यंत कर्जमाफीचा ऐतिहासिक निर्णय

### 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'ला मंत्रिमंडळाची मंजुरी

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील शेतकरी बांधवांसाठी मोठा दिलासा देणारा आणि कृषी क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरणारा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' मंजूर करण्यात आली. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, थकीत कर्जासाठी वन टाईम सेटलमेंट आणि नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या योजनेत कर्जमाफीसाठी



जमीन धारणेचा कोणताही निकष लागू करण्यात आलेला नाही. त्यामुळे अल्पभूधारकांसह सर्व पात्र शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. मात्र राजकीय पदाधिकारी, सरकारी कर्मचारी, आयकर भरणारे नागरिक तसेच सहकारी संस्थांतील २५ हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन घेणारे अधिकारी व कर्मचारी यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. दोन लाखांपर्यंत संपूर्ण कर्जमाफी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकबाकी असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेली कर्जे या योजनेत पात्र ठरणार आहेत. ज्या शेतकऱ्यांची मुद्दल व व्याजासह एकूण थकबाकी दोन लाख रुपयांपर्यंत आहे, त्यांना संपूर्ण कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे लाखो शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दोन लाखांपेक्षा जास्त कर्जासाठी 'वन टाईम सेटलमेंट' ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांना 'वन टाईम सेटलमेंट' योजनेचा लाभ मिळणार आहे. अशा शेतकऱ्यांनी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असलेली रक्कम ३१ मार्च २०२७ पूर्वी बँकेत भरल्यानंतर शासन त्यांच्या खात्यात दोन लाख रुपयांची कर्जमाफी जमा करणार आहे. पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जखातीही या योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे अनुदान शेतकऱ्यांना केवळ कर्जमाफीच नव्हे, तर वेळेत कर्जफेड करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचाही निर्णय सरकारने घेतला आहे.

## 'भाबीजी घर पर हैं' प्रकरणाला नवे वळण!

### शिल्पा शिंदेची धक्कादायक कबुली

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई| प्रतिनिधी :** लोकप्रिय दूरचित्रवाणी मालिका 'भाबीजी घर पर हैं' मधील 'अंगूरी भाभी' या भूमिकेमुळे घराघरात पोहोचलेली अभिनेत्री शिल्पा शिंदे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. २०१६ मध्ये मालिकेतून बाहेर पडताना निर्माते संजय कोहली यांच्याविरोधात केलेल्या लैंगिक छळाच्या तक्रारीबाबत शिल्पाने नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये महत्त्वपूर्ण वक्तव्य केले असून, या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. कॉमेडियन भारती सिंग आणि हर्ष लिंबाचिया यांच्या पॉडकास्टमध्ये बोलताना शिल्पा शिंदेने त्या काळातील वादग्रस्त घडामोडींवर भाष्य केले. तिने सांगितले की, मालिकेतून बाहेर पडल्यानंतर करार, मानधन आणि व्यावसायिक मतभेदांमुळे ती मोठ्या तणावाखाली होती. त्याच पार्श्वभूमीवर निर्मात्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. शिल्पाच्या म्हणण्यानुसार, त्यावेळी कायदेशीर आणि व्यावसायिक दबावामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली होती. करारासंबंधीचे वाद, नोटिसा आणि कामाच्या संधींवरील मर्यादा यामुळे ती अडचणीत सापडली होती. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी काही निर्णय घेण्यात आले, असा दावा तिने केला. तिने पॉडकास्टमध्ये केलेल्या वक्तव्यानुसार, त्या काळात दाखल झालेल्या तक्रारीबाबत आता ती वेगळ्या दृष्टिकोनातून विचार करत असून, संबंधित प्रकरणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. वादानंतर सामंजस्याने तोडगा शिल्पा शिंदेने सांगितले की, कालांतराने संबंधित वाद सामंजस्याने मिटविण्यात आला. त्यानंतर दोन्ही बाजूंमधील मतभेद दूर झाले असून, सध्या निर्मात्यांसोबतचे




संबंधही सौहार्दपूर्ण असल्याचे तिने नमूद केले. दरम्यान, शिल्पाच्या या नव्या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा मनोरंजन विश्वात चर्चांना उधाण आले आहे. जवळपास दशकभर चर्चेत राहिलेल्या या प्रकरणावर अभिनेत्रीने केलेल्या खुलाशामुळे सोशल मीडियावरही विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. टीव्ही इंडस्ट्रीत चर्चेला उधाण 'भाबीजी घर पर हैं' या मालिकेतील शिल्पा शिंदेच्या निर्गमनानंतर निर्माण झालेला वाद त्या काळात टीव्ही इंडस्ट्रीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला होता.

### भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न

आता अनेक वर्षांनंतर अभिनेत्रीने केलेल्या नव्या वक्तव्यामुळे या प्रकरणाकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे. शिल्पाच्या म्हणण्यानुसार, त्यावेळी कायदेशीर आणि व्यावसायिक दबावामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली होती. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी काही निर्णय घेण्यात आले, असा दावा तिने केला. तिने पॉडकास्टमध्ये केलेल्या वक्तव्यानुसार, त्या काळात दाखल झालेल्या तक्रारीबाबत आता ती वेगळ्या दृष्टिकोनातून विचार करत असून, संबंधित प्रकरणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

### जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## कॅनडातील कॉन्स्टेलेशन सॉफ्टवेअर'कडून पुण्यातील 'पिओसिट सॉफ्टवेअर'चे अधिग्रहण

### भारतीय सहकारी बँकिंग सॉफ्टवेअर क्षेत्राला जागतिक बळ; एआय-आधारित सेवांचा विस्तार

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई/पुणे | प्रतिनिधी :** सॉफ्टवेअर क्षेत्रातील एक मोठी आणि महत्त्वाची व्यावसायिक घडामोड समोर आली असून, कॅनडातील नामांकित 'कॉन्स्टेलेशन सॉफ्टवेअर' (सीएसआय) या कंपनीने भारतातील 'पिओसिट सॉफ्टवेअर सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीचे अधिग्रहण केले आहे. या महत्त्वपूर्ण करारामुळे जागतिक सॉफ्टवेअर बाजारपेठेत दोन्ही कंपन्यांचे स्थान अधिक बळकट होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी पकड असलेल्या कंपनीने पुण्यातील एका महत्त्वाच्या सॉफ्टवेअर कंपनीला आपल्या समूहात सामील करून घेतल्याने या व्यवहाराकडे तंत्रज्ञान जगतात मोठ्या उत्सुकतेने पाहिले जात आहे. 'पिओसिट सॉफ्टवेअर सोल्यूशन्स' ही भारतीय कंपनी प्रामुख्याने सहकारी बँकिंग आणि वित्त क्षेत्रांसाठी उपयुक्त आणि अत्याधुनिक सॉफ्टवेअर प्रणाली तयार करण्याचे काम करते. आपल्या दर्जेदार सेवा आणि ग्राहकांच्या गरजेनुसार तयार केलेल्या तंत्रज्ञानामुळे या कंपनीने बाजारपेठेत स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता 'कॉन्स्टेलेशन सॉफ्टवेअर'चा भाग झाल्यामुळे पिओसिट कंपनीला जागतिक पातळीवरील एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) सारखे अद्ययावत तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची व्याप्ती आणि मोठ्या समूहाच्या अनुभवाचा थेट फायदा मिळणार आहे. या पाठबळामुळे कंपनीला आपल्या सेवांचा विस्तार अधिक वेगाने आणि मोठ्या




प्रमाणावर करणे शक्य होईल. १९९५ पासून, 'कॉन्स्टेलेशन सॉफ्टवेअर' संबंधित उद्योगांसाठी अत्यंत महत्त्वाचे (क्रिटिकल) सोल्युशन्स देणाऱ्या व्हर्टिकल मार्केट सॉफ्टवेअर (व्हीएमएस) कंपन्यांचे अधिग्रहण करणे, त्यांची उभारणी करणे आणि त्यांना जोपासणे या तत्त्वावर काम करत आहे. या महत्त्वपूर्ण करारामुळे जागतिक सॉफ्टवेअर बाजारपेठेत दोन्ही कंपन्यांचे स्थान अधिक बळकट होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी पकड असलेल्या कंपनीने पुण्यातील एका महत्त्वाच्या सॉफ्टवेअर कंपनीला आपल्या समूहात सामील करून घेतल्याने या व्यवहाराकडे तंत्रज्ञान जगतात मोठ्या उत्सुकतेने पाहिले जात आहे.३० हून अधिक वर्षांच्या वाटचालीनंतर, 'सीएसआय'ने १६० हून अधिक देशांमधील १२५ हून अधिक व्हर्टिकल्समधील १,००० हून अधिक कंपन्यांचे अधिग्रहण केले आहे. सीएसआय ही टोरंटो स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबद्ध असलेली कंपनी आहे. गेल्या आर्थिक वर्षात त्यांचा महसूल ११.६ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका होता आणि जगातील टॉप १० सॉफ्टवेअर कंपन्यांपैकी एक म्हणून ती नावारूपास आली आहे.

### जागतिक दर्जाचे 'एआय एनेबल्ड' सॉफ्टवेअर

'पिओसिट'चे संस्थापक संचालक दीपक सुराणा, अभिजित नांगरे आणि श्रीकांत मुळे यांनी यावर भर दिला की, 'कॉन्स्टेलेशन कुटुंबात सामील होणे, हा पिओसिट आणि आम्ही उभारलेल्या टीमसाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. आम्हाला विश्वास आहे की, आम्ही एकत्रितपणे प्रत्येक भागधारकासाठी प्रचंड मूल्य (व्हॅल्यू) निर्माण करू. सॉफ्टवेअर कंपन्यांना जोपासण्याचा 'कॉन्स्टेलेशन सॉफ्टवेअर'चा जागतिक अनुभव 'पिओसिट'ला एआय सारख्या नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास मदत करेल. भारतातील सहकारी पतसंस्थांना आता जागतिक दर्जाचे 'एआय एनेबल्ड' सॉफ्टवेअर आणि सेवा मिळतील. पिओसिट एक स्वतंत्र कंपनी म्हणून राहील आणि आमच्या ग्राहकांसाठी सर्वोत्तम सॉफ्टवेअर आणि सेवा देण्यासाठी आमची बांधिलकी कायम राहील. पूर्वीप्रमाणेच संस्थापक 'टीम पिओसिट'चे नेतृत्व करत राहील.'

# ई-केवायसी करूनही 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ नाही!

## कागदपत्रांची पूर्तता करूनही महिनोनमहिने पैसे जमा नाहीत

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणीबाबत धुळ्यात अनेक महिलांनी नाराजी व्यक्त केली आहे. शासनाच्या निर्देशानुसार ई-केवायसी आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही अनेक महिलांना गेल्या काही महिन्यांपासून योजनेचा लाभ मिळत नसल्याचा आरोप समोर आला आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, शासनाने तातडीने प्रलंबित लाभाची रक्कम खात्यात जमा करावी, अशी मागणी होत आहे. राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठ्या गाजावाजात सुरू केलेल्या या योजनेतून लाखो महिलांना आर्थिक मदत दिली जात आहे. मात्र, ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या महिलांना योजनेतून वगळण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर राज्यभरात महिलांनी ई-केवायसीसाठी शासकीय कार्यालये, सेवा केंद्रे आणि बँकांमध्ये मोठी गर्दी केली. त्याचवेळी अनेक महिलांनी मुदतवाढ देण्याची मागणीही केली होती. धुळे शहरातील लाभार्थी महिला आशाबाई कैलास सोनवणे यांनी सांगितले की, शासनाने घालून दिलेल्या सर्व अटी पूर्ण करून ई-केवायसी केली, आवश्यक कागदपत्रे सादर केली, मात्र गेल्या तीन महिन्यांपासून त्यांच्या खात्यावर योजनेची रक्कम जमा झालेली नाही. वारंवार चौकशी करूनही स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांच्या मते, गरजू महिलांना लाभ मिळण्याऐवजी काही पात्र महिलाच लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे प्रशासनाने अशा प्रकरणांची स्वतंत्र पडताळणी करून तातडीने न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. धुळे तालुक्यातील हेंकळवाडी येथील गोडमबाई चव्हाण यांनीही अशीच व्यथा मांडली. त्यांनी सांगितले की, योजनेचा लाभ सुरुवातीला नियमित मिळत होता. मात्र शासनाच्या नव्या निर्देशांनुसार ई-केवायसी करून सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरही गेल्या पाच महिन्यांपासून खात्यावर कोणतीही रक्कम जमा झालेली नाही. यासाठी अनेक वेळा संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन चौकशी केली, परंतु अद्याप समस्या सुटलेली नाही. वारंवार कार्यालयीन फेऱ्या मारूनही लाभ मिळत नसल्याने त्यांनी शासनाच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केली.

### निकाली काढण्याची मागणी

धुळ्यातील अनेक महिलांनी अशाच स्वरूपाच्या तक्रारी केल्या असून, ई-केवायसी पूर्ण झाल्यानंतरही लाभ थांबविण्यात आल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने लाभार्थ्यांच्या प्रकरणांची तातडीने छाननी करून पात्र महिलांच्या खात्यात प्रलंबित रक्कम जमा करावी, अशी मागणी महिलांकडून होत आहे. दरम्यान, योजनेच्या अंमलबजावणीतील तांत्रिक अडचणी, पडताळणी प्रक्रिया किंवा इतर कारणांमुळे लाभ रोखला गेला आहे का, याबाबत प्रशासनाकडून अधिकृत स्पष्टीकरणाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# मुंबई एपीएमसीला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' दर्जा

## ; जयकुमार रावल यांनी स्वीकारला अध्यक्षपदाचा पदभार

जन सम्राट टाईम्स



**मुंबई । प्रतिनिधी :** राज्याच्या कृषी आणि पणन क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणणाऱ्या नव्या बाजार समिती कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली असून, नवी मुंबईतील वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीला (एपीएमसी) अधिकृतपणे 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' (एमएनआय – मार्केट ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्स) म्हणून घोषित करण्यात आले आहे. या ऐतिहासिक निर्णयानंतर राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी मंगळवारी अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारत नव्या व्यवस्थेची औपचारिक सुरुवात केली. वाशी येथील बाजार समिती कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात जयकुमार रावल यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला. राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने २९ मे २०२६ रोजी जारी केलेल्या विशेष अधिसूचनेनुसार हा बदल करण्यात आला आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ अंतर्गत मुंबई कृषी उत्पन्न बाजाराला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' हा विशेष दर्जा बहाल करण्यात आला आहे. संचालक मंडळ बरखास्त; नवी प्रशासकीय रचना लागू नव्या कायदेशीर तरतुदीनुसार नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले आहे. बाजाराचे प्रशासन आणि धोरणात्मक निर्णय नव्या संरचनेनुसार घेतले जाणार आहेत. बाजार व्यवस्थापनात अधिक पारदर्शकता, कार्यक्षमता आणि राष्ट्रीय स्तरावरील समन्वय साधला जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्य शासनाने केलेला हा निर्णय केवळ प्रशासकीय बदल नसून कृषी व्यापाराला नवे आयाम देणारा ठरणार असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. कृषी व्यापाराला मिळणार राष्ट्रीय व्यासपीठ मुंबई एपीएमसीला 'एमएनआय' दर्जा मिळाल्याने देशभरातील कृषी व्यापार, कृषी उत्पादनांची साखळी, निर्यात व्यवस्था आणि आधुनिक विपणन प्रणालीला मोठी चालना मिळणार आहे. देशातील विविध राज्यांतील व्यापारी, निर्यातदार आणि कृषी उद्योजक यांच्यासाठी हा बाजार अधिक प्रभावी केंद्र म्हणून विकसित होण्याची शक्यता आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# सौरव उघडे यांची भारतीय सैन्यात निवड!

## मिरवणुकीद्वारे तरुणाचा गौरव

जन सम्राट टाईम्स



**पारनेर । प्रतिनिधी :** अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीवर मात करत स्वकर्तृत्व, मेहनत आणि अथक परिश्रमाच्या जोरावर पारनेर तालुक्यातील चिंचोली येथील सौरव उघडे यांनी भारतीय सैन्यात स्थान मिळवून गावासह संपूर्ण परिसराचा मान उंचावला आहे. सौरव यांच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी मिरवणूक काढून त्यांचा जंगी सत्कार करत जल्लोष साजरा केला. देशसेवेचे स्वप्न मनात बाळगून वाढलेल्या सौरव यांनी आपल्या ध्येयाप्रती असलेली निष्ठा आणि सातत्य याच्या बळावर हे यश संपादन केले. चिंचोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पारनेर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधून उच्च शिक्षण घेतले. शिक्षणासोबतच सैन्य भरतीची तयारीही त्यांनी सातत्याने सुरू ठेवली. सौरव यांची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत सामान्य आहे. त्यांची आई शेतमजुरी करते तर वडील माथाडी कामगार म्हणून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. विशेष म्हणजे, यापूर्वी सलग तीन वेळा अपयश आले होते. मात्र त्या अपयशाने खचून न जाता त्यांनी जिद्दीने प्रयत्न सुरू ठेवले आणि अखेर भारतीय सैन्यात निवड होण्याचे स्वप्न साकार केले. सैन्यात नियुक्ती झाल्याची बातमी मिळताच उघडे कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार उरला नाही. आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. काही वेळातच ही आनंदवार्ता संपूर्ण गावात पसरली आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उघडे कुटुंबाच्या घरी जमा झाले. यानंतर गावातून सौरव यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशे, डीजेच्या तालावर युवकांनी जल्लोष केला. लाल आणि निळ्या गुलालाची उधळण करत संपूर्ण गाव देशसेवेच्या या अभिमानास्पद क्षणाचा साक्षीदार ठरला. यावेळी चिंचोली येथील बुद्ध विहारात विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सरपंच सतीश पिंपरकर यांच्या हस्ते सौरव उघडे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. संविधान प्रचारक सचिन नगरे यांनी संविधानाच्या उद्देशिकेची प्रतिमा सौरव उघडे तसेच बुद्ध विहाराला भेट दिली. कार्यक्रमास जामगावचे सरपंच सुनील शिंदे, सामाजिक कार्यकर्ते बबन गायकवाड, बौद्ध महासभेचे जयवंत लव्हांडे, माजी सरपंच बाळासाहेब झंजाड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संपूर्ण गावाला अभिमान वाटत आहे

सौरव उघडे यांच्या यशामुळे चिंचोली गावातील तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्दीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. भारतीय सैन्यात दाखल झालेल्या या युवकावर आज संपूर्ण गावाला अभिमान वाटत आहे.

---

# नरिमन पॉईंटवरील ऐतिहासिक 'एअर इंडिया' इमारत महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात

## १६०१ कोटीच्या व्यवहाराला पूर्णविराम; दुरुस्तीनंतरच शासकीय कार्यालयांचे स्थलांतर – मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

जन सम्राट टाईम्स



**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबईतील नरिमन पॉईंट या देशातील सर्वात महत्त्वाच्या व्यावसायिक केंद्रांपैकी एक असलेल्या परिसरातील ऐतिहासिक 'एअर इंडिया' इमारत अखेर महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात आली आहे. मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांच्या उपस्थितीत सोमवारी झालेल्या हस्तांतरण सोहळ्यात ही प्रक्रिया अधिकृतपणे पूर्ण झाली. राज्याच्या प्रशासकीय पायाभूत सुविधांच्या विस्ताराच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. राज्य मंत्रिमंडळाने ८ सप्टेंबर २०२३ रोजी या इमारतीच्या खरेदीला मंजुरी दिली होती. त्यानंतर विविध प्रशासकीय आणि आर्थिक प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या. अखेरीस महाराष्ट्र शासनाने Air India Assets Holding Limited (AIAHL) कडून तब्बल १६०१ कोटी रुपयांना ही प्रतिष्ठित वास्तू संपादित केली. सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक निधी अदा केल्यानंतर आज या इमारतीचा अधिकृत ताबा राज्य शासनाकडे आला. हस्तांतरणानंतर मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत सार्वजनिक बांधकाम मंत्री Shivendrasinhraje Bhosale यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले. इमारतीत कोणतेही शासकीय कार्यालय स्थलांतरित करण्यापूर्वी तिची सखोल स्ट्रक्चरल तपासणी करण्यात यावी आणि आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण केल्यानंतरच अंतर्गत सजावट व इतर विकासकामांना सुरुवात करावी, असे त्यांनी सांगितले. कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे स्पष्ट करत भोसले यांनी दीर्घकालीन टिकाऊपणा लक्षात घेऊन दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे करण्यात यावीत, असे निर्देश दिले. इमारतीतील विद्युत यंत्रणा, तांत्रिक सुविधा, फिटिंग्ज आणि सुरक्षाव्यवस्था अत्याधुनिक व उच्च दर्जाची असावी, यावर त्यांनी विशेष भर दिला. याशिवाय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराचे आणि बाह्य भागाचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व प्रशासकीय वैभवाला साजेसे सुशोभीकरण करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. यासाठी देशातील नामांकित वास्तुविशारद आणि तज्ज्ञ संस्थांचे मार्गदर्शन घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

---

# डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी यांच्या संशोधनग्रंथाला साहित्यविश्वात प्रतिसाद

## 'खानदेशातील आधुनिक कवींच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास' ग्रंथाचे प्रकाशन

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव। प्रतिनिधी :** धरणगाव येथील रहिवासी तथा एरंडोल येथील रा.ति. काबरे विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक संतोष धनगर यांचे कनिष्ठ सुपुत्र आणि प्रताप महाविद्यालय, अमळनेर येथील मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी यांच्या 'खानदेशातील निवडक आधुनिक कवींच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास' या संशोधनग्रंथाचे नुकतेच प्रकाशन झाले असून साहित्य, संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रात त्याची विशेष दखल घेतली जात आहे. जळगाव येथील अकॅडमी बुक हाऊस प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या ग्रंथामध्ये खानदेशातील आधुनिक साहित्यप्रवाह समृद्ध करणाऱ्या सहा निवडक कवींच्या कवितांचा सखोल आणि चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. आधुनिक कवितेतील सामाजिक भान, परिवर्तनवादी विचार, प्रबोधनात्मक मूल्ये आणि समकालीन वास्तवाचे विविध पैलू संशोधनात्मक पद्धतीने उलगडण्याचा प्रयत्न या ग्रंथातून करण्यात आला आहे. या ग्रंथात कवी अशोक सोनवणे, डॉ. संजीवकुमार सोनवणे, प्रा. बी. एन. चौधरी, प्रा. वा. ना. आंधळे, पांडुरंग सुतार तसेच कवयित्री माया धुप्पड यांच्या कवितांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. साहित्याच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची प्रेरणा देणाऱ्या विचारधारेचे अभ्यासपूर्ण विवेचन हे या ग्रंथाचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जात आहे. संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी हे सध्या अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनासोबतच त्यांनी संशोधन क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या आतापर्यंत दहा संशोधनपर शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या यशस्वी संशोधन कार्याबद्दल धनगर प्राध्यापक महासंघ, जळगाव जिल्हा मल्हार सेना, कर्तव्य बहुउद्देशीय संस्था तसेच नगरसेवक सुनील चौधरी यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. मार्गदर्शकांचे मोलाचे योगदान या संशोधन कार्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. रमेश जाधव यांच्यासह प्रा. डॉ. दिलीप बिरुटे, प्रा. डॉ. दासू वैद्य, प्रा. डॉ. कैलास अंभुरे, प्रा. डॉ. गजाननराव सानप, एम.एम. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वासुदेव वले, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रा. डॉ. म. सु. पगारे, तसेच प्रताप महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. डॉ. अतुल सूर्यवंशी, डॉ. प्रमोद गुलगुले आणि कल्पिताताई पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. मराठी साहित्य संशोधनासाठी मोलाची भर खानदेशातील आधुनिक कवितेचा चिकित्सक, वस्तुनिष्ठ आणि संशोधनात्मक दृष्टीकोनातून घेतलेला हा अभ्यास मराठी साहित्य संशोधन क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना साहित्यप्रेमी, अभ्यासक आणि संशोधकांकडून व्यक्त होत आहे. भविष्यातही दर्जेदार संशोधनपर ग्रंथ लेखन करून मराठी साहित्य समृद्ध करण्याचा मानस डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी यांनी व्यक्त केला आहे.

---

# टिटवाळा नांदप रोडवरील प्रचंड वाहतूक कोंडी!

## एकेरी वाहतुकीमुळे वाहनचालक हैराण



टिटवाळा नांदप रोडवर सुरू असलेल्या काँक्रीटीकरणाच्या कामामुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी आणि वाहनांच्या लागलेल्या रांगा.

जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** टिटवाळा येथील नांदप रोडवर सुरू असलेल्या काँक्रीटीकरणाच्या कामामुळे परिसरातील नागरिकांना तीव्र वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. टिटवाळा रेल्वे स्थानक, वाजपेयी चौक, निमकर नाका आणि उड्डाणपूल यांना जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असल्याने दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. मात्र, रस्त्याच्या एका बाजूचे काँक्रीटीकरण सुरू असल्याने वाहतुकीसाठी केवळ एकेरी मार्ग उपलब्ध असून वारंवार कोंडीची समस्या निर्माण होत आहे. या मार्गावर सकाळी आणि सायंकाळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कामाच्या ठिकाणी पुरेशी वाहतूक व्यवस्था नसल्याने तसेच पर्यायी मार्गांबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध करून न दिल्याने वाहनचालक आणि नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. ठेकेदाराच्या हलगर्जीपणाचा आरोप स्थानिक नागरिकांच्या मते, रस्त्याच्या कामाला सुरुवात करताना प्रशासनाने पर्यायी मार्गांची माहिती देणे आणि संबंधित दिशादर्शक फलक उभारणे आवश्यक होते. मात्र, कामाच्या ठिकाणी अशा प्रकारची कोणतीही प्रभावी व्यवस्था नसल्याने बाहेरून येणाऱ्या वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काम सुरू असलेल्या परिसरात वाहतूक नियोजनाचा अभाव आणि ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांची गैरसोय वाढल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न वाहतूक कोंडीबरोबरच पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यावर टाकण्यात आलेली खडी, मुरूम आणि इतर बांधकाम साहित्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि शालेय विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. दुकानदारांनाही वाहतूक कोंडीचा फटका बसत असून ग्राहकांची ये-जा कमी झाल्याने व्यावसायिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. महापालिकेकडून लवकरच दिलासा देण्याचे आश्वासन याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे उपअभियंता हरून इनामदार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीची दखल घेतली. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना अधिक चांगली सुविधा उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संबंधित ठेकेदाराला पर्यायी मार्ग दर्शविणारे फलक तातडीने लावण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. नागरिकांनी शक्यतो पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहनही महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. प्रशासनाकडून तातडीच्या उपाययोजनांची मागणी रस्त्याचे काँक्रीटीकरण हे विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असले तरी त्यादरम्यान नागरिकांची गैरसोय कमीत कमी राहील यासाठी प्रशासनाने प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भावना स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# आझाद मैदानावर हजारो असंघटित कामगारांचा आक्रोश

## विविध मागण्यांसाठी सिटूचे ठिय्या आंदोलन तीव्र ; पेन्शन व श्रमसंहिता रद्द करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स



**मुंबई । प्रतिनिधी:** असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (CITU)च्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आक्रोश ठिय्या आंदोलनाला आज मोठा प्रतिसाद मिळाला. बांधकाम, घरेलू, बिडी, ऊसतोड, यंत्रमाग आणि इतर असंघटित क्षेत्रातील हजारो कामगार आंदोलनात सहभागी झाल्याने आझाद मैदान परिसर घोषणांनी दणाणून गेला. कालपासून सुरू असलेल्या या आंदोलनाचे नेतृत्व सिटूचे राज्याध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, सरचिटणीस एम. एच. शेख, के. आर. रघु, डॉ. विवेक मॉन्टेरो, शुभा शमीम, भूषण पाटील, उज्वला पडलवार, भरमा कांबळे, नसीमा शेख, आरमायटी इराणी, किरण मोघे, आबासाहेब चौगुले आणि युसुफ मेजर यांच्यासह विविध कामगार संघटनांच्या नेत्यांनी केले. यावेळी उपस्थित नेत्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या कामगारविरोधी धोरणांवर जोरदार टीका करत असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. कामगारांना सामाजिक सुरक्षा, किमान वेतन आणि रोजगाराची हमी देण्याऐवजी त्यांना असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलले जात असल्याचे वक्त्यांनी सांगितले. आंदोलनाला सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व अर्जुन सेनगुप्ता समितीच्या सदस्या Sumangala Damodaran यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, देशातील जवळपास ९० टक्के कामगार असंघटित क्षेत्रात कार्यरत असून देशाच्या अर्थव्यवस्थेत त्यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे या कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी योजना आणि भरीव आर्थिक तरतूद करणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी युवक संघटनांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला. बेरोजगारी आणि वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर कामगारांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. जाती-धर्माच्या नावावर समाजात फूट पाडून मूलभूत प्रश्नांपासून लक्ष विचलित केले जात असल्याचा आरोप करत त्यांनी सामाजिक ऐक्य आणि कामगार एकजुटीचे महत्त्व अधोरेखित केले. आंदोलनाची दखल घेत राज्याचे कामगार मंत्री शिष्टमंडळाने असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या बैठकीत डॉ. डी. एल. कराड, एम. एच. शेख, आमदार Vinod Nikole, डॉ. विवेक मॉन्टेरो, आरमायटी इराणी, किरण मोघे, भरमा कांबळे आणि आबासाहेब चौगुले सहभागी झाले होते.

### कामगारांच्या प्रमुख मागण्या

आंदोलनकर्त्यांनी सर्व क्षेत्रातील कामगारांना कायम नोकरी देऊन किमान ३० हजार रुपये वेतन लागू करावे, भविष्य निर्वाह निधी, ईएसआय आणि पेन्शन योजना लागू कराव्यात, असंघटित क्षेत्रासाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळे स्थापन करावीत, चारही श्रमसंहिता रद्द कराव्यात आणि महागाई नियंत्रणात आणून स्वस्त दरात गॅस उपलब्ध करून द्यावा, अशा प्रमुख मागण्या सरकारसमोर मांडल्या.